- क -



नियमित फौजदारी खटला क्र.८५/२०२२
सुचिता वि. मधुकर
निशाणी क्र.०७

**पडताळणी**

मी, सुचिता सुनिल नानचे, वय-५५वर्षे, धंदा-गृहिणी, रा.फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग.

१. शपथेवर खरे सांगते की, दि.१७/०५/२०२२ रोजी मधुकर याने माझा रस्ता अडवून तु आमच्या विरुध्द केस केली तर तुला मारुन टाकेन अशी धमकी दिली. त्याने मला, माझ्या मुलाला व पतीला मारण्याची धमकी दिली. शशिकांत वसंत तिरोडकर व श्रीकांत वसंत तिरोडकर यांनी ही रस्ता अडवून मारण्याची धमकी दिली. माझे वडिल वसंत आजारी असताना शशिकांत व श्रीकांत यांनी जुने कुलमुखत्यारपत्र रद्द केले व त्यांच्या नावे नविन कुलमुखत्यारपत्र करुन त्याच्या आधारे सर्व्हे क्र.१३ हिस्सा क्र.२ व सर्व्हे क्र.१३ हिस्सा क्र.५ या जमिनी मधुकर राघो गोसावी यांना विकली. त्यावेळी माझे वडिल स्ट्रेचर वर होते. त्यांना फसवून तसेच कुलमुखत्यारपत्र करण्यासाठी घेऊन गेले. त्यामुळे माझी फसवणूक झालेली आहे.

समक्ष

24/03/26.

(शुभम जी. लटुरिया)
न्यायदंडाधिकारी वर्ग – १,
कणकवली.
दिनांक: २४/०३/२०२६

फिर्यादीची सही/अंगठा